एरंडोल पोलीस स्टेशन
दिनांक 07/07/2025

प्रति,

मा. संपादक सो.

---

**जबरी लुट चा गंभीर गुन्हा 24 तासाच्या आत उघड करुन आरोपी अटक केलेबाबत**

दिनांक 06/07/2025 रोजी रात्री 02.00 ते 03.00 वाजेच्या दरम्यान फिर्यादी उषाबाई भिका बडगुजर वय 52 वर्षे व्यवसाय गृहीणी रा. जयहिंद चौक ,गांधीपुरा एरंडोल जि.जळगाव या गाढ झोपेत असतांना अचानक तिन ते चार लोक (अंदाजे) फिर्यादीच्या घरात शिरले व त्यांनी फिर्यादीचे तोंड कपड्याने बांधले व नंतर फिर्यादीयांचे हात व पाय दोरीने बांधले तेव्हा त्याच्या पैकी एकाने रुमालाने तोंड दाबले व बाकी लोकां नी हात व पाय दोरीने बांधले व ते हिला मारा व हिचे पाय ओढा असे बोलत होते, त्यांनी फिर्यादीच्या अंगावर असलेले 08 ग्रॅम वजनाचे सोन्याचे, 6.5 ग्रॅम वजनाचे चांदीचे दागीने व रोख रक्कम असे बळजबरीने हिसकावुन चोरुन नेले होते. म्हणुन एरंडोल पोलीस स्टेशन येथे दिनांक 07/07/2025 रोजी गुरनं. 107/2025 भा.न्या.सं. 309(6), 3(5), 351(2), 352, 331(2), 115(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासात मा. पोलीस अधिक्षक श्री. महेश्वर रेड्डी सो. यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार पो.नि. निलेश गायकवाड व त्यांची टिम गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेत असतांना कुठल्याही पो.नि. गायकवाड यांना गोपनीय बातमीदारांकडुन मिळालेल्या माहीतीच्या आधारे 24 तासाच्या आत गुन्हयातील मुळ आरोपी नामे 1) मयुर अरुण बडगुजर, वय 20 वर्ष, रा. जगवानी नगर, जळगाव यास अटक करुन त्याचे कडेस चौकशी केली असता त्यांने गुन्हा केल्याचे कबुल केले असुन गुन्हा करतेवेळी त्याचे सोबत असलेले आरोपी 2) नंदु भगवान निकुंभ, वय 33 वर्ष, रा. जुने जळगाव, जळगाव, 3) तुषार सुनिल महाजन, वय 22 वर्ष, रा. सुप्रीम कॉलनी, जळगाव हे सोबत असल्याचे सांगीतले. त्यांना जळगाव येथुन विवीध भागातुन अटक केली असुन त्यांनी देखील गुन्हयाची कबुली दिली आहे. आरोपीतांकडुन 03 मोबाईल व 01 मोटारसायकल जप्त करण्यात आली असुन त्यांचे कडुन गुन्हयातील गेला माल जप्त करीत आहेत.

सदरची कामगीरी ही मा. पोलीस अधिक्षक श्री. महेश्वर रेड्डी सो., मा. अपर पोलीस अधिक्षक कविता नेरकर सो., मा. उप विभागीय पोलीस अधिकारी श्री. विनायक कोते सो. यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि निलेश गायकवाड, स.पो.निरी. शंकर पवार, पोहेकॉ अनिल पाटील, पो.ना. दिपक पाटील, पो.ना. योगेश महाजन, पो.ना. सचिन पाटील, पो.कॉ. अमोल भोसले, पो.कॉ. आकाश शिंपी, पो.कॉ. भाऊसाहेब मिस्तरी अशांनी केली आहे.

(पोलीस निरीक्षक)
एरंडोल पोलीस स्टेशन